दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
• कोल्हापूर गुरुवार, दि. २८ मे २०२६

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांचे कॅम्पस प्लेसमेंटमध्ये यश

- संकेत खद्रेला तब्बल १८ लाखांचे पॅकेज
- गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा



**जनप्रवास : कोल्हापूर**

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित विवेकानंद कॉलेजने आपल्या शैक्षणिक आणि प्रशिक्षण दर्जामधील उत्कृष्टतेची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे. कॉलेजच्या बीबीए आणि एमबीएमधील विद्यार्थ्यांची विविध नामांकित नॅशनल आणि मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये उत्तम पॅकेजसह निवड झाली आहे.

बिझनेस ॲनालिटिक्स विभागात शिक्षण घेत असलेल्या संकेत खद्रे याने सर्वाधिक १८ लाख रुपये वार्षिक पॅकेजमिळवलेआहे. ह्युमन रिसोर्समधील श्रेया भोसलेला १० लाखांचे,तर याच विभागातील प्रणाली भामनगोल हिला ५.६ लाखांचे पॅकेज मिळाले आहे. फायनान्स विभागातील कुणाल भोसले याला ४ लाख आणि मार्केटिंगमधील शालिनी जांगीड हिला देखील ४ लाखांच्या पॅकेजची ऑफर मिळाली आहे. याशिवाय इतर अनेक विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रातील नॅशनल आणि मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये निवड झाली आहे.यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी कॉलेजच्या आवारात विशेष सत्कार झाला. या कार्यक्रमाला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, कॉलेजचे प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील आणि आयक्यूएसी प्रमुख डॉ. श्रुती जोशी, बीबीए आणि एमबीए विभागाचे प्रमुख डॉ. विराज जाधवयांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते निवड झालेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी कौस्तुभ गावडे यांनी विवेकानंद कॉलेजमधील बीबीए आणि एमबीए अभ्यासक्रमांमध्ये कौशल्य विकासावर विशेष भर दिला जातो. विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट क्षेत्रासाठी सज्ज करणे आणि त्यांच्यामधून भविष्यातील उत्तम नेतृत्व घडवणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्यावर खूप मेहनत घेतातआणि आजचे प्लेसमेंटचे यश हे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या एकत्रित कष्टाचे फळ आहे,असे प्रतिपादन केले. कॉलेजचे प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, डॉ. श्रुती जोशी यांनी मनोगत मांडले. प्रास्ताविक आणि आभार बीबीए आणि एमबीए विभागाचे प्रमुख डॉ. विराज जाधव यांनी केले.

पुण्य नगरी
गुरुवार, २८ मे २०२६

# विवेकानंद कॉलेजला कुलगुरू डॉ. कामत यांची भेट



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी रविवारी विवेकानंद महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीस्थळी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी डॉ. कामत यांचा पुष्पगुच्छ, शाल व संस्थेचे मानचिन्ह देऊन सत्कार केला. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी कुलगुरू डॉ. कामत यांच्या शैक्षणिक योगदानाचा गौरव करताना सांगितले की, डॉ. कामत हे विवेकानंद कॉलेजमधील इलेक्ट्रॉनिक्स विषयाचे माजी विद्यार्थी असून, त्यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये शिक्षक म्हणूनही सेवा बजावली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या एकूण चौदा कुलगुरूंपैकी पाच कुलगुरू हे संस्थेचे माजी विद्यार्थी असल्याचा उल्लेखही त्यांनी केला. यावेळी बोलताना डॉ. कामत म्हणाले, 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांची शिदोरी सोबत घेऊन विद्यार्थी ते कुलगुरू असा माझा प्रवास झाला आहे.'

यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सहसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. एस. एम. गवळी, डॉ. आर. व्ही. शेजवळ, हितेंद्र साळुंखे, प्रा. महेश साळुंखे, प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील आदी उपस्थित होते.